रेशीमशेती

# असे करा तुती बागेचे व्यवस्थापन





**आर.एस. साळवे**
सहायक प्राध्यापक
(मो.नं. ९१६८४९७८८३)
**डॉ. अरुण मुंडे**
प्राचार्य, आदित्य कृषी महाविद्यालय, बीड

रेशीम शेतीमध्ये तुतीच्या पाल्याचा ६०% वाटा असतो. तुती बागेत तण नियंत्रण, पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, बागेची छाटणी आणि पीक व्यवस्थापन या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. दर्जेदार पाल्यामुळे रेशीम कीटकांची चांगली वाढ होऊन कोषांचे चांगले उत्पादन मिळते.

**पहिल्या वर्षातील देखभाल** : जून ते सप्टेंबर या कालावधीत पट्टा पध्दतीने तुती लागवड कलम आणि रोपांद्वारे आपण केलेली असते. एकदा केलेली तुती लागवड जवळपास १५ वर्षांपर्यंत टिकते. त्यामुळे १५ वर्षांपर्यंत शेतकऱ्यास कोषांचे उत्पादन घेता येते. दरवर्षी नवीन तुती लागवड करावी लागत नाही. त्यामुळे पहिल्या वर्षी तुती बागेची निगा शास्त्रीय पध्दतीने राखावी. योग्य व्यवस्थापनामुळे तुती बागेतील सर्व कलमे, रोपे जिवंत राहतात. त्याच बरोबरीने तुतीची मुळे, खोडांची एकसारखी वाढ होऊन पाल्याचे चांगले उत्पादन मिळते. उत्पादनाबरोबरच पाला रसरशीत, दर्जेदार राहतो.

**आंतरमशागत** : बागेतील वाढलेल्या तणांमुळे कलमांना सूर्यप्रकाश मिळत नाही. गवत वाढल्याने अन्नद्रव्ये कमी पडून तुतीची पाने गळून पडतात. बागेतील तापमानात वाढ होऊन पानेही पिवळी पडतात. तुतीची लागवड केल्यापासून एक महिन्याने खुरपणी करून तण काढावे. तण काढताना तुती कलमांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी.





**बागेची छाटणी** : लागवडीपासून साडेचार ते पाच महिन्यांनी आपण पहिले कीटक संगोपन घेतो. फांदी पध्दतीने कीटक संगोपनात तुती पाल्याऐवजी संपूर्ण फांदी झाडाच्या बुडख्यापासून कापतात. छाटणी करताना जमिनीपासून ६ ते ८ इंच अंतरावर फांद्या कापाव्यात, ज्यामुळे पुढील वेळी फांद्यांची संख्या वाढण्यास मदत होईल. बैलजोडीने आंतरमशागतीची कामेही चांगल्या प्रकारे करता येतात. छाटणी करताना खोडाची साल निघणार नाही, कलम रोप मुळापासून उपटून निघणार नाही याची काळजी घ्यावी.

**तुती रोपवाटिका** : तुती कलमे काही कारणाने १०० टक्के फुटू शकली नाहीत, तर बागेमध्ये झाडांची संख्या कमी होऊन त्याचा परिणाम पाला उत्पादनावर होऊन पिकांची संख्या कमी होते. नंतर बागेत तुटाळ पडल्याचे पूर्ण बाग बहरल्यानंतर लक्षात येते. अशा वेळी आपण बाद कलमाच्या जागी नवीन कलम लावून तुटाळ साधण्याचा प्रयत्न करतो. परंतु कलमाभोवतीची उंच वाढलेली तुतीची झाडे कलम फुटण्यावर परिणाम करतात. त्यामुळे नव्याने लावलेली कलमे फुटत नाहीत व तुटाळ भरून निघत नाही. तुटाळ भरताना कलमाऐवजी तुतीची रोपे लावावी म्हणजे अडचण येत नाही. तुटाळ राहण्याचा धोका लक्षात घेऊन नवीन तुती लागवड करतेवेळी प्रत्येक शेतकऱ्याने मोकळ्या पट्ट्यात १००० ते १५०० कलमांची रोपवाटिका करावी. ■